# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि /1/109/2-346/2020 दिनांक - 1 एप्रिल, 2020

## परिपत्रक

**विषय - अकृषि विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये / अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड 19" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन.**

संदर्भ - 1) मा.अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे दि.28 मार्च, 2020 चे पत्र
2) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं /कोरोना/ मवि-1/2020/4085 दि.31 मार्च, 2020.

आपणास विदितच आहे की, आपला देश आणि एकूणच जग कोविड-19 च्या आजारामुळे अभुतपूर्व संकटास सामोरे जात आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू केल्याने संकट निर्माण झाले आहे. स्वत:ला संरक्षण देण्यासाठी आणि या विषाणुचा पुढील प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि सावधगीरिच्या उपाययोजनांबद्दल लोकांना जागृत करणे इतकेच नव्हे तर शासनास या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठीच्या प्रयत्नांना बळकटी देणे ही देखील सर्व शैक्षणिक संस्थांची जबाबदारी आहे.

अशा परिस्थितीत, मा.अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रांद्वारे सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरू, शासकीय महाविद्यालये /अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक यांना, आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड-19" मध्ये जमा करून आव्हानात्मक काळात आपल्या देशवासियांच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी एकत्र उभे राहून या महासंकटाचा मुकाबला करणेकामी आपले मोलाचे योगदान देण्याबाबत आवाहन केले आहे.

उपरोक्त संदर्भांकित पत्रांन्वये करण्यात आलेल्या आवाहनानुषंगाने, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग व मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा येथील सर्व शिक्षक, संवैधानिक अधिकारी, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या माहे मार्च-2020 च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड19" मध्ये जमा करण्यात येत आहे.

सर्व शासकीय महाविद्यालये /अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्यांनी त्यांच्या अधिनस्थ सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सदर बाब कृपया निदर्शनास आणून द्यावी व आपल्या स्तरावर त्यांचे

अधिनस्थ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च-2020 च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून "मुख्यमंत्री सहायता निधी-कोव्हीड 19" मध्ये जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

आदेशान्वये....

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,

1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

2) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा

3) प्राचार्य/संचालक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय महाविद्यालये /अशासकीय अनुदानित महाविद्यालये.

प्रतिलिपी माहितीकरिता सादर -

1) मा.अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.

2) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

3) सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे

4) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

5) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

6) अध्यक्ष महासचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ, अमरावती.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. धीरेन्द्र पाल सिंह
अध्यक्ष

Prof. D. P. Singh
Chairman

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
(मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)

बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002

दूरभाष Phone : कार्यालय Off. : 011-23234019, 23236350
फैक्स Fax : 011-23239659, e-mail : cm.ugc@nic.in | web: www.ugc.ac.in

28th March, 2020

**APPEAL: For Contribution to Combat COVID-19**

Dear Colleagues,

Our country and the world as a whole are passing through unprecedented times due to COVID-19 pandemic. The number of persons infected with Corona virus are increasing day by day. We, the educational fraternity, have a great responsibility of not only making the people aware of preventive and precautionary measures to safeguard themselves and check the further spread of this virus, but also come forward to contribute financially to strengthen the efforts of the Government to combat the COVID-19 pandemic.

We, at UGC, have decided to make a humble contribution of One Day Salary to the Prime Minister's National Relief Fund. I appeal to the Vice Chancellors of the Universities and Directors/Principals of Institutes/Colleges to urge the teaching and non-teaching colleagues of their institutions to come forward and contribute for this noble cause. I am sure that this humble contribution of the educational fraternity will go a long way in serving the humanity in present moments of crisis.

Let us stand together for the well-being of our countrymen and the mankind as a whole during this challenging time.

Best wishes,

DPSingh

Prof. D. P. Singh
Chairman

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
web:www.dhepune.gov.in. E-Mail prash.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२/२६१३०६२७/२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२० / 4085 दिनांक 31 MAR 2020

प्रति,

१. मा.कुलगुरू,
सर्व अकृषि विद्यापीठे.
२. प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये.

**विषय : अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन.**

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि.२८ मार्च, २०२० चे पत्रान्वये व काही शिक्षक/शिक्षकेतर संघटनांनी कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा मुकाबला करण्यासाठी एक दिवसाचे वेतन कपात करणेबाबत दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपला देश आणि एकूणच जग कोविड-१९ च्या आजारामुळे अभुतपूर्व संकटास सामोरे जात आहे. कोरोना विषाणूची लागण झालेल्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपल्या सर्व शैक्षणिक संस्थाची जबाबदारी आहे की, स्वत:ला संरक्षण देण्यासाठी आणि या विषाणूचा पुढील प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि सावधगिरीच्या उपाययोजनांबद्दल लोकांना जागृत करणे इतकेच नव्हे तर शासनास या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठीच्या प्रयत्नांना बळकटी देणे ही देखील मोठी जबाबदारी आहे.

सर्व अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आवाहन करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू केल्याने संकट निर्माण झाले आहे. संपूर्ण राज्यातील संचारबंदीमुळे रोग निवारण कामी सर्व कर्मचारी यांना सक्रिय होता येत नाही. अशा परिस्थितीत या संकटाला सामोरे जाण्यासाठी वरील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांच्या कुलगुरू/प्राचार्य/संचालक यांना आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आपले एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड-१९" मध्ये जमा करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. उपरोक्त आव्हानात्मक काळात आपल्या देशवासियांच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी एकत्र उभे राहुया तसेच या महासंकटाचा मुकाबला धैर्याने व एकजुटीने करणेकामी आपले मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

प्रत माहितीस्तव : सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

E:\d\General.docx